पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १४

**सभावृत्तांत**

**दिनांक - ०६/०७/२०२१** **वेळ - दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार** दिनांक **०६/०७/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते तर काही सन्मा.सदस्य ऑन लाईन पध्दतीने सहभागी झाले होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.साधना अंकुश मळेकर
३. मा.अनुराधा गणपत गोरखे
४. मा.सुनिता हेमंत तापकीर
५. मा.सोनवणे शारदा हिरेन
६. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
७. मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
८. मा.खानोलकर प्रज्ञा महेश

या शिवाय मा.चारठाणकर – उप आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.बोदडे – सहाय्यक आयुक्त, मा.पोरेड्डी, मा.रामगुडे – कार्यकारी अभियंता, मा.खडतरे – उप अभियंता, मा.देशमुख – लेखाधिकारी, मा.बहाद्दरपुरे – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

**उपस्थित सन्मा.सदस्य यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्रमांक १९, दि.१५/०६/२०२१ मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.शारदा सोनवणे, मा.संगिता ताम्हाणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) दिघी-भोसरी शिवेलगत मंजूर विकास योजनेतील १५ मी.रुंद रस्त्याबाबत – मा.सुनिता तापकीर, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) मौजे दापोडी येथील स.नं.३६ मधील ३० मी.सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजूची जागा ताब्यात घेणेबाबत – मा.सुनिता तापकीर, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) दापोडी येथील स.नं.३६ मध्ये औद्योगिक विभाग तसेच निळया व लाल पुररेषेत सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या उजव्याबाजूकडील ८० गुंठे जागा ताब्यात घेणेबाबत – मा.अनुराधा गोरखे, मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) झोपडपट्टयांमध्ये स्वच्छता कीट पुरविणेबाबत – मा.सोनाली गव्हाणे, मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) कामाच्या जागा बदल करणेस मान्यता मिळणेबाबत – मा.सुनिता तापकीर, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

----------

मा.शहर सुधारणा समिती सभा (कार्यपत्रिका क्रमांक १३) दि.१५/०६/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २० | विषय क्रमांक - ०१

दिनांक – ०६/०७/२०२१ | विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.शारदा सोनवणे | अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/११/१६८/२०२१, दि.२९/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील मंजूर विकास योजनेतील महापालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झालेल्या क्षेत्रातील मौजे भोसरी येथील स.नं.२०९ व २१० पैकी मध्ये आरक्षण क्र.४०५ उद्यान व त्यालगत उत्तर दक्षिण १२ मी. रस्ता प्रस्तावित आहे. आरक्षण क्र.४०५ उद्यानाचे भूसंपादनानुसार १४३८२.७० चौ.मी. क्षेत्राचा ताबा दि.०७।१०।२००५ रोजी महापालिकेस भूसंपादनाने मिळालेला आहे. परंतु सदर १२ मी. रस्त्यामध्ये गरीब नागरिकांची घरे असल्याने मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांची घरे न पाडता सदर रस्ता स.नं.२१० पैकी मध्ये मनपाचे मोठ्या गटाराच्या पश्चिमेला लागून स्थलांतरीत करणेबाबत व सदर रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे क्षेत्र त्यांचेच मालकीचे स.नं. २११/१ पैकी मधून घेणेबाबत संबधित जागामालक यांनी दि.२४।०३।२००५ रोजी महापालिकेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अर्जदाराकडून स.नं.२११।१ चे ७।१२ नुसार त्यांचे मालकीची जागा दर्शविणारा मोजणी नकाशा घेऊन रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्राचा रितसर ताबा घेऊन तदनंतरच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेतील दक्षिणोत्तर १२ मी. रस्त्याची आखणी व आरक्षणाची स.नं.२११/१ मधील ताब्यात घेतलेल्या २२४४ चौ.मी. क्षेत्रासह होणारी सुधारित हद्द असा फेरबदलाची कार्यवाही करणेचे प्रस्तावास तत्कालीन मा.आयुक्त यांनी दि.२५।११।२००५ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने संबधित जागा मालक यांचेकडून ७/१२ उतारा, रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्राची मोजणी नकाशा, टायटल सर्च रिपोर्ट

तसेच यु.एल.सी. बाबत र.रू.३००/- चे मुद्रांकावर शपथपत्र व बंधपत्र लिहून घेण्यात आलेले आहे. सदर ताब्यात घ्यावयाच्या क्षेत्र बक्षिसपत्राने ताब्यात घेणेकामी बक्षिसपत्राचा मसुदा तसेच मालकीबाबत कायदा सल्लागार, पिपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दि.२२|०६|२००९ रोजी अभिप्राय घेवून अर्जदाराकडून शपथपत्र बंधपत्र लिहून घेऊन दि.१० सप्टेंबर २००९ रोजी रस्ता फेरबदल केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्र स.नं.२११/१ पैकी मधून बक्षिसपत्राने मनपाचे ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर दस्त दुय्यम निबंधक हवेली १७ - ०८७५२, दि.३०|०९|२००९ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. तसेच सदर ताब्यात घेतलेल्या २२४४ चौ.मी. क्षेत्रासाठी फेरफार क्र.२४७१४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेली असून तसा सुधारित ७/१२ उतारा व फेरफार दि.०३|१२|२०१० रोजीच्या पत्रान्वये कामगार तलाठी, भोसरी यांनी महापालिकेकडे पाठविलेला आहे. सबब, सदर ठिकाणी आजच्या जागेवरच्या परिस्थितीनुसार विकास योजनेत बदल करणे क्रमप्राप्त आहे. सदर फेरबदलानंतर उत्तर दक्षिण १२ मी रस्त्याची भूसंपादनाची पुढील कार्यवाही करणे शक्य होईल. प्रस्तुत प्रकरणी दक्षिणउत्तर १२ मी. रस्त्यामधील गरीब नागरिकांची घरे वाचविणेचे दृष्टीने मनपाचे मोठ्या गटाराला लागून पश्चिमेकडे १२ मी. रस्ता आखणी करणेकामी व रस्ता आखणी बदलल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे स.नं. २११/१ मधून मनपाच्या ताब्यात घेतलेल्या क्षेत्रानुसार आरक्षणाचे हद्दीमध्ये महाराष्ट्र व प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व फेरबदलाची कार्यवाही करणेस व फेरबदलाची सुचना प्रसिध्द झाल्यानंतर महापालिकेस प्राप्त होणा-या हरकती/सुचना अर्जांबाबत संबधितांना सुनावणी देणे तद्नुषंगीक वैधानिक प्रक्रीया पुर्ण करून फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करणे यासाठी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक - ०२

दिनांक – ०६/०७/२०२१

सुचक : मा.शारदा सोनवणे अनुमोदक : मा.संगिता ताम्हाणे

संदर्भ – मा.शारदा सोनवणे, मा.संगिता ताम्हाणे यांचा प्रस्ताव -

मा.शहर सुधारण समिती सभा ठराव क्रमांक १९ दि.१५/०६/२०२१ मधील “ **गट नं.९२ मधील ग्रीन झोन चे क्षेत्र निवासी झोन मध्ये बदल करण्यास मान्यता देणेकामी”** या पुढील **“मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.”** हा मजकूर वगळण्याचे दुरुस्तीसह मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक - ०३

दिनांक – ०६/०७/२०२१

सुचक : मा.सुनिता तापकीर अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर

संदर्भ – मा.सुनिता तापकीर, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०७/नवि-१३, दि.९ जुलै २००८, शासन निर्णय क्र.टिपीएस १८०९/१९८५/प्र.क्र.१८९३/०९/नवि-१३, दि.१८/०८/२००९ व अधिसुचना क्र.टिपीएस-१८१२/ १६०/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ई.पी.-मंजूरी/नवि-१३, दि.०२/०३/२०१५ अन्वये मंजूर असलेल्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. दिघी-भोसरी शिवेलगत मंजूर विकास योजनेतील १५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. मधील १५.०० मी. रुंद रत्याचे आरक्षण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार आहे. मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. मधील १५.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा.नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतुकीसाठी रस्ता विकसीत होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांच्या वाहतुकीच्या हितार्थ मौजे भोसरी व दिघी स.नं.७३ व ७४ पै. येथील सावंतनगर कमानीपासून पुढे ते बी.यु.भंडारी येथील गृहप्रकल्पापर्यंत मंजूर विकास योजनेतील १५.०० मी.रस्ता हा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये ९.०० मी. करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक - ०४

दिनांक – ०६/०७/२०२१

सुचक : मा.सुनिता तापकीर अनुमोदक : मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.सुनिता तापकीर, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव -

मौजे दापोडी येथील स.नं.३६ मधील ३०.०० मी सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजूची स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या भिंतीला लागून व यांत्रिकी भवन, दापोडी यांच्या इमारती मागील जागा मंजूर विकास आराखड्यातील औद्योगिक विभागात समाविष्ट आहे. सदर जागा ही पुर्णपणे नदी ते निळी पुररेषेखाली असल्याकारणाने सदर जागा महाराष्ट्र शासनाकडील संबंधित विभागास प्रस्ताव सादर करुन त्यावर खेळाचे मैदान व जलतरण तलावासाठी व उद्यानासाठी १ हेक्टर (२.४७ एकर) क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन व म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ अन्वये वैधानिक कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत

येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक - ०५

दिनांक – ०६/०७/२०२१

सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.प्रज्ञा खानोलकर

संदर्भ – मा.अनुराधा गोरखे, मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड शहरातील दापोडी व लगतचे परिसरात मोठ्या प्रमाणात दाट लोकवस्ती असून झोपड्यांचे प्रमाण जास्त आहे. तसेच पवना नदीमुळे दरवर्षी पावसामुळे पुरसदृश्य परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे दापोडी येथील स.नं.३६ मध्ये औद्योगिक विभाग तसेच निळ्या व लाल पुररेषात सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या उजव्या बाजून ८० गुंठे जागा कार्यशाळा व्यवस्थापक, एस.टी.महामंडळ व महाराष्ट्र शासनाकडील संबंधित विभागाकडे प्रस्ताव सादर करून सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आल्यानंतर मंजूर विकास आराखड्यामधील जागेवरील औद्योगिक विभागावर अग्निशम केंद्राचे आरक्षण प्रस्तावित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाबाबत कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक - ०६

दिनांक – ०६/०७/२०२१

सुचक : मा.सोनाली गव्हाणे अनुमोदक : मा.सुनिता तापकीर

संदर्भ – मा.सोनाली गव्हाणे, मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव –

मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.१७ दि.०२/०३/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घोषित अघोषित झोपडपट्टी वासियांना त्यांचे आरोग्य हे उत्तम राहण्याकरिता तसेच त्यांच्या कुटुंबियांचे आरोग्यमान आरोग्यदृष्ट्या उत्तम राहणे तसेच त्यांचे कोरोना ह्या संसर्गजन्य रोगापासुन बचाव करणे ही महानगरपालिकेची पालक म्हणून प्राथमिक जबाबदारी असलेने झोपडपट्टी वासियांच्या घरामध्ये त्यांच्या कुटुंबांकरिता स्वच्छता किट पुरविणे गरजेचे आहे. प्रत्येक झोपडपट्टीतील कुटुंबाना सदर स्वच्छता किट मध्ये ४ सॅनिटायझर हॅन्डी बाटल्या (सुंगंधित), १ लाईझॉल (फरशी पुसणेसाठी) (सुगंधित), २ हॅन्डवॉश, २ नॅपकिन, १० कापडी मास्क पुरविण्यात येतील. त्यामुळे तेथील रहिवाशांचा बचाव होईल. सदरचे काम करणेसाठी National Co- operative Consumer Federation of India Ltd. ( Pune Branch) या संस्थेस थेट पध्दतीने देण्यास मान्यता देणेत येत आहे. सदर साहित्य पुरवण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच शहर सुधारणा विभागा अंतर्गत येणा-या लेखाशिर्षावरील अ.क्र. १) महसुली – झोनिपु स्थापत्य विभाग किरकोळ दुरुस्ती व देखभाल पान क्र.९१७ ते ९४८,

२) महसुली – विद्युत विभाग पान क्र.९४९ ते ९५३, ३) भांडवली - झोनिपु स्थापत्य पान क्र.५९८ ते ६०२, ४) भांडवली - विदयुत विभाग पान क्र.६३२ ते ६३६ यावरुन खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर योजना पुर्ण करणेकामी झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागातील तसेच इतर विभागातील अखर्चित रक्कम सदरच्या लेखाशिर्षावर वेळोवेळी उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचे साहित्य सर्व झोपडपट्टीमधील सर्व कुटुंबाना सदर साहित्याचा लाभ मिळावा तसेच आवश्यकतेनुसार याकामी निधी कमी पडल्यास वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देणेस, तसेच सदरची कार्यवाही झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडील प्रशासकीय विभागामार्फत करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक - ०७

दिनांक – ०६/०७/२०२१

सुचक : मा.सुनिता तापकीर अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर

संदर्भ – मा.सुनिता तापकीर, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव –

मा.शहर सुधारणा समितीने ठराव क्र.१८, दि.०८/०१/२०२० अन्वये निविदा क्र. ५३/२/२०२८-१९, र.रु.२,३६,९४,३४५/- BSUP प्रकल्प विभागाकडुन काढण्यात आलेली आहे. मंजूर विकास आराखड्यानुसार ३०.०० मी. डी.पी. रस्ता महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमधुन जात आहे. प्रस्तावात नमुद निविदेमधुन सदर रस्ता विकसीत करणेकामी रस्त्याने बाधित होणा-या झोपड्या दापोडी येथील आ.क्र.३/५ खेळाचे मैदान येथे पत्राशेड तयार करुन त्या जागेवर स्थलांतरित करावयाचे होते. तथापि, सदर प्रस्तावास बांधकाम परवानगी नाकारल्याने काम करता येऊ शकत नाही. सद्यस्थितीत महात्मा फुलेनगर झोपडपट्टीचे बाधित क्षेत्रावर १८.०० मी. रुंदीचा प्रस्ताव करावयाचा असल्याने स.नं. ८५ पै. मधील उर्वरित १२.०० मी. रस्त्याच्या जागेवर डी.पी. रस्त्याने बाधित झोपडीधारकांसाठी पत्राशेड तयार करुन तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरित करावयाचे आहे. तरी प्रस्तावात नमुद केलेनुसार निविदेमधील कामाकरीता मुळ जागेमध्ये बदल करुन पत्राशेड तयार करणेकामी मान्यता दिलेली होती. JnNURM-BSUP शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत से.क्र.२२, निगडी येथील पात्र लाभार्थ्यांचे अजंठानगर व काळभोर गोठा येथे झोनिपू प्रशासन विभागामार्फत पत्राशेडमध्ये तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरण करण्यात आले होते. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल दावा क्र.१८०६/२०११ (नवीन दावा PIL No.१४/२०१७) अन्वये दि.१९/०३/२०१२ रोजीचे आदेशान्वये से.क्र.२२, निगडी येथील प्रकल्पास स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे प्रकल्पाचे काम जैसे थे परिस्थितीमध्ये बंद आहे. सद्यस्थितीत सदर पत्राशेड मोडकळीस आलेले असून तुटलेले/कुजलेले स्वरुपात आहेत. त्यामुळे तेथील नागरिकांचे पुनर्वसन करणे गरजेचे असल्याने विषयांकित कामातून दापोडी येथील ३० मी. रस्त्याने बाधित झोपडीधारकांसाठी पत्राशेड बांधणे ऐवजी अजंठानगर येथील मोडकळीस आलेल्या पत्राशेडची दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणे या जागा बदलाच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३३४/२०२१
दिनांक : ०२/०७/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.